

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजच्या गुणी विद्यार्थी गौरव समारंभात बोलताना कथाकथनकार आप्पासाहेब खोत. व्यासपीठावर प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार आदी.

# विद्यार्थ्यांनी संस्कृती जपली पाहिजे : खोत

**कोल्हापूर :** यशस्वी होण्यासाठी मोठी स्वप्ने पाहिली पाहिजेत. तरुणाईमध्ये जग जिंकण्याची शक्ती आहे. मर्यादा लक्षात घेऊन एखादे क्षेत्र निवडल्यास यश नक्कीच मिळते. विद्यार्थ्यांनी मातीशी नाळ जोडून आपली संस्कृती जपली पाहिजे, असे प्रतिपादन कथाकथनकार आप्पासाहेब खोत यांनी केले. विवेकानंद कॉलेजच्या गुणी विद्यार्थी गौरव समारंभात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. याप्रसंगी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक मिळविलेल्या कला, क्रीडा, सांस्कृतिक, एन.सी.सी. व एन.एस.एस. विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी प्रास्ताविक केले. परीक्षा नियंत्रक डॉ. जी. जे. नवाथे, डॉ. एकनाथ आळवेकर, प्रा. एम. ए. कुरणे, प्रा. एस. एस. कुंडले यांनी सन्मानपत्राचे वाचन केले. प्रा. सुप्रिया पाटील, प्रा. समीक्षा फराकटे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सहिदा कच्छी यांनी आभार मानले. यावेळी डॉ. श्रुती जोशी, प्रा. संजय थोरात, प्रा. एन. आर. सणगर, डॉ. आरिफ महात, सुनीता भोसले उपस्थित होते.

01/04/24